# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:13.09.2025** **वार:शनिवार**

1. देशाचे 15वे उपराष्ट्रपती म्हणून सी. पी. राधाकृष्णन यांनी घेतली शपथ
2. 'ज्ञान भारतम' डिजिटल पोर्टलचं पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन
3. महाराष्ट्र आणि अमेरिकेतील आयोवा राज्यादरम्यान सामंजस्य करार
4. राज्यातील 34 जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदासाठीचं आरक्षण जाहीर आणि
5. अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासंदर्भात राज्य सरकारचा शासन आदेश जारी

**<u>उपराष्ट्रपती शपथविधी</u>**

सी. पी. राधाकृष्णन यांनी भारताचे पंधरावे उपराष्ट्रपती म्हणून काल शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. राष्ट्रपती भवनात झालेल्या या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड, केंद्रीय मंत्री अमित शाह, राजनाथ सिंह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभाचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधानपरिषदचे सभापती राम शिंदे यांच्यासह विविध राज्यांचे मुख्यमंत्री, राजकीय नेते, उच्चपदस्थ अधिकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. उपराष्ट्रपतीपदाची शपथ घेतल्यानंतर राधाकृष्णन यांनी महात्मा गांधी तसंच अटलबिहारी वाजपेयी यांच्या समाधीस्थळी जाऊन त्यांना आदरांजली अर्पण केली.

**<u>ज्ञान भारतम पोर्टल</u>**

भारतामध्ये हस्तलिखितांचा मोठा खजिना आहे; ज्ञान भारतम मिशनच्या माध्यमातून हा वारसा जगासमोर खुला करण्यात येत आहे; असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. 'भारताच्या ज्ञानपरंपरेचा हस्तलिखित वारशाच्या माध्यमातून शोध' या संकल्पनेवर आधारित परिषदेत; 'ज्ञान भारतम' या डिजिटल पोर्टलचं उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते काल झालं. त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी बोलताना पंतप्रधान म्हणाले….

**ज्ञान भारतम् मिशन भारत के संस्कृति, साहित्य और चेतना का उद्घोष बनने जा रहा है। हजारों पीढ़िया का चिंतन मनन भारत के महान ऋषियों, आचार्यों और विद्वानों का बोध और स्रोत, हमारे ज्ञान परंपराएं, हमारे वैज्ञानिक धरोहरें ज्ञान भारतम् मिशन के जरिए हम उन्हें डिजिटाइज करने जा रहे हैं। मैं इस मिशन के लिए सभी देशवासियों को बधाई देता हूं।**

या प्रकल्पात सहभागी असलेले तज्ञ अभ्यासक, तसंच या परिषदेतील एका सत्राचे समन्वयक आणि पुण्याच्या भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिर संस्थेचे निबंधक आणि अभिरक्षक श्रीनन्द बापट ज्ञान भारतम बाबत बोलताना म्हणाले…..

**हस्तलिखितांचा वारसा हा एकत्रित प्रयत्नातून सांभाळण्याचा आणि वाढवण्याचा जो हा नवीन उपक्रम माननीय पंतप्रधानांनी घोषित केलेला आहे. त्याच्यामध्ये हस्तलिखितांची नोंदणी त्यांचं वाचन संपादन प्रकाशन या सगळ्या गोष्टी येतात तसंच त्यांच्या जतनाची प्रक्रिया येते आणि मुख्य म्हणजे तो वारसा सगळ्यांपर्यंत सहजपणे पोहचवण्याच्या दृष्टीने डिजिटायझेशन हा त्यातला एक महत्त्वाचा अंश हा त्याच्यात समाविष्ट आहे. त्यामुळे या वारशाचं सर्व अंगांनी उत्तम जतन होण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत आवश्यक स्वागतार्ह असाच आहे. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिरामध्ये पंधरा हजार हस्तलिखितांचं डिजिटायझेशन नॅशनल मिशन फॉर मॅन्युस्क्रिप्ट कडून झालेलं होतं आणि आता संस्थेने सीएसआर**

**च्या अंतर्गत पुढचं काम हे जोमाने सुरू केलेलं आहे आणि त्यामुळे लवकरच आम्ही आमची संपूर्ण हस्तलिखितांची लायब्ररी ही डिजिटाइज करू.**

**आयोवा-सामंजस्य करार**

महाराष्ट्र राज्य आणि अमेरिकेतील आयोवा राज्य यांच्यादरम्यान विविध क्षेत्रातील सामंजस्य करारांवर काल स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आयोवाच्या राज्यपाल किम रेनॉल्ड्स यांच्या उपस्थितीत हा करार करण्यात आला. आयोवा राज्य अमेरिकेतील अन्न, शेती तसंच कृषीतंत्रज्ञान क्षेत्रात अग्रेसर मानले जाते. उभय देशांदरम्यान झालेल्या या करारांमुळे कृषी, जैवतंत्रज्ञान, वित्तीय सेवा, पायाभूत सुविधा, नवीकरणीय ऊर्जा आणि तंत्रज्ञान अशा विविध महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये सहकार्याची नवी दारं खुली होत,नव्या संधी निर्माण होणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

**जि.प.आरक्षण**

राज्यातील 34 जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदासाठीची आरक्षण सोडत काल जाहीर झाली. यानुसार, परभणी आणि वर्धा जिल्हा परीषदेचं अध्यक्षपद अनुसूचित जातीच्या उमेदवारासाठी आरक्षित राहणार असून, चंद्रपूर, बीड येथील अध्यक्षपद अनुसूचित जातीच्या महिला उमेदवारांसाठी राखीव असणार आहे. अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी पालघर आणि नंदुरबार जिल्हा परिषदेचं अध्यक्षपद आरक्षित झालं असून अकोला, वाशिम, आणि अहिल्यानगर इथं अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी अध्यक्षपद राखीव असेल. नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी सोलापूर, हिंगोली आणि भंडारा जिल्हा परिषदेचं अध्यक्षपद राखीव असेल. नांदेड, जालना, सातारा, धुळे आणि रत्नागिरी जिल्हा परिषदेत नागरिकांच्या मागास प्रवर्गातल्या महिला उमेदवारांसाठी अध्यक्षपद राखीव ठेवलं आहे. ठाणे, सांगली, कोल्हापूर, धाराशिव, लातूर, अमरावती, गोंदिया आणि गडचिरोली जिल्हा परिषदांचं अध्यक्षपद सर्वसाधारण प्रवर्गातल्या महिला उमेदवारासाठी आरक्षित झालं आहे. यवतमाळ, बुलढाणा, छत्रपती संभाजीनगर, पुणे, जळगाव, नाशिक, सिंधुदुर्ग, आणि रायगड जिल्हा परिषदेचं अध्यक्षपद खुल्या प्रवर्गासाठी आहे.

**गडकरी-रस्ते उद्घाटन**

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते काल नागपूर-अमरावती महामार्गावरील जळवपास तीन किलोमीटर लांबीच्या नवीन चारपदरी पुलाचं उद्घाटन करण्यात आलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित होते. या पुलाचं नामकरण ज्ञानयोगी दिवंगत श्रीकांत जिचकर असं करण्यात आलं आहे.

**कृषीप्रदर्शन-गडकरी**

शेतकऱ्यांनी यांत्रिकीकरण तसंच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण अत्यंत गरजेचं आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता ही शेती आणि शेतकरी या दोघांनाही स्वयंपूर्ण करू शकते असं मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केलं आहे. ते काल नागपुरात पत्रकार परिषदेत बोलत होते. 21 ते 24 नोव्हेंबर दरम्यान, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठातर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'अग्रोव्हिजन2025' या कृषी प्रदर्शनाची माहिती त्यांनी यावेळी दिली.

**प्रादेशिक बातमीपत्र वेळबदल**

हिंदी दिनानिमित्त उद्या 14, सप्टेंबर रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा राष्ट्राला उद्देशून संदेश देणार आहेत. हा संदेश आकाशवाणीवरून सकाळी 7 वाजून 10 मिनिटांनी, प्रसारित करण्यात येणार आहे. त्यामुळे पुणे केंद्रावरून प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र उद्या सकाळी 6 वाजून 43 मिनिटांनी प्रसारित करण्यात येईल.

**आपत्ती-पुनर्वसन**

राज्यात यावर्षी जून ते ऑगस्ट या कालावधीत अवकाळी पाऊस आणि अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीपोटी शेतकऱ्यांना 73 कोटी 91 लाख 43 हजार रुपयांच्या मदतीला राज्य शासनाने मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला असल्याची माहिती; मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली आहे. नागपूर, वर्धा,

चंद्रपूर, हिंगोली आणि सोलापूर जिल्ह्यातील 84 हजारांहून अधिक शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात मदतीची रक्कम थेट जमा करण्यात येणार आहे.

**जीएसटी**

वस्तु आणि सेवा कर प्रणालीतील सुधारणेच्या दुसऱ्या टप्प्यात शेती साठी लागणाऱ्या संसाधनांवरील करात कपात करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. याबाबत पुणे जिल्ह्यातील शेतकरी यशपाल जाधव यांची ही प्रतिक्रिया..

**कृषी उपकरणावरील जीएसटी दर कमी केल्याने शेतीचा खर्च कमी होईल आणि त्यामुळे शेतकऱ्याचा नफा वाढेल कृषी उपकरणे ट्रॅक्टरवरील जीएसटी अठरा वरून पाच पर्यंत कमी करण्यात आला आहे यात शेतकऱ्यांसाठी वनीकरण यंत्रे, कापणी यंत्रे, कंबाईन हार्वेस्टर, पीक कापणी मशीन, गवत कापणी यंत्र, कंपोस्ट मशीन इत्यादींवर जीएसटी दर कमी करण्यात आला या बदलाचा लहान आणि मध्यम शेतकऱ्यांना लक्षणीय फायदा होईल**

**नवी मुंबई विमानतळ**

नवी मुंबई विमानतळाचं उद्घाटन येत्या 30 सप्टेंबर रोजी होणार असल्याचं सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक आणि उपाध्यक्ष विजय सिंघल यांनी काल सांगितलं. हा विमानतळ नोव्हेंबर महिन्यात प्रत्यक्षात कार्यान्वित होणार असून, त्याची तुलना लंडनच्या हिथ्रो विमानतळाशी होऊ शकते असं सिंघल यांनी यावेळी सांगितलं. या विमानतळावर पोहोचण्यासाठी मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया वरून जलवाहतूक सुरु करण्यात येणार आहे.

**म्यूच्युअल फंड-मुंबई**

म्यूच्युअल फंडातून पैसे काढून घेताना लागणारे कमाल शुल्क 5 टक्क्यांवरून 3 टक्के करण्याचा निर्णय भारतीय रोखे आणि विनिमय मंडळ अर्थात सेबी ने घेतला आहे. सेबीचे अध्यक्ष तुहिन कांत पांडे यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. एक वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी म्यूच्युअल फंडात गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांना हे शुल्क भारावं लागत.

**हिंगोली-पाउस**

हिंगोली जिल्ह्यात काल दुपारनंतर मुसळधार पाउस झाला. वसमत आणि औंढा तालुक्यात ढगफुटी सदृश पाउस झाला. गुंडा गावाजवळ असलेल्या ओढ्याला आलेल्या पुरात दोन महिला वाहून गेल्या. जिल्ह्यात अनेक ठिकाणी झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला असून, शेतीचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे.

**हवामान**

येत्या 24 तासात राज्याच्या सर्वच विभागांमध्ये पावसाची शक्यता असून तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.